**साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या नामवंत साहित्यिकास ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक कै.विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार देण्यासाठी निवड समिती.**

**महाराष्ट्र शासन**

मराठी भाषा विभाग

शासन निर्णय क्रमांक-विंदापु-१०१२/प्र.क्र.८४/२०१२/भाषा-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक :- ३१ ऑगस्ट, २०१२.**

**वाचा :- १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.साजीगौ-२०१०/प्र.क्र.११६/सां.का.३, दिनांक १३ एप्रिल, २०१०.**

**२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र.विकपु-२०११/निसपु/प्र.क्र.१८०/सां.का.४, दिनांक ३ सप्टेंबर, २०११.**

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाच्यावतीने रंगभूमी, पुस्तक प्रकाशन, वाड्.मय इत्यादी क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना जीवन गौरव पुरस्कार दिला जातो. त्याच धर्तीवर साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंत साहित्यिकांना कै.श्री.विंदा करंदीकर यांच्या नांवे जीवन गौरव पुरस्कार देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात केली होती. त्याअनुषंगाने मराठी साहित्य / वाड्.मय क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या नामवंत साहित्यिकास जीवन गौरव पुरस्कार देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य शासनातर्फे देण्यात येणारा वरील पुरस्कार वितरित करण्याची कार्यवाही यापूर्वी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत करण्यात येत होती. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषेशी संबंधित सर्व कार्यालये, संस्था व मंडळ एकाच विभागाच्या कार्यक्षेत्राखाली आणण्याकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या अधिसूचनेन्वये स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेले १) श्री.पु.भागवत पुरस्कार २) उत्कृष्ट वाड्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार व ३) विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार हे तीनही पुरस्कार सन २०१२-१३ या वित्तीय वर्षापासून मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून वितरित केले जाण्यासाठी हा विषय राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

२. मराठी साहित्य / वाड्.मय क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केलेल्या जेष्ठ साहित्यिकाला कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यास तसेच सदर पुरस्कार प्रदान करण्यासाठी आयोजित करावयाच्या समारंभाच्या खर्चास शासनाच्या संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली आहे. सन २०१२-१३ पासून या पुरस्काराचे स्वरुप रुपये ५,००,०००/- ( रुपये पाच लक्ष मात्र ) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

३. प्रस्तुत विषय हा मराठी भाषा विभागाकडे वर्ग करण्यात आल्यामुळे सदर पुरस्कारासाठी निवड समितीची पुनर्रचना करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यामुळे सदर पुरस्काराच्या निवडीसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | - | अध्यक्ष |
| २. | मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | - | उपाध्यक्ष |
| ३. | सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई | - | सदस्य |
| ४. | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई | - | सदस्य |
| ५. | अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, मुंबई | - | सदस्य |
| ६. | संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई | - | सदस्य |
| ७. | सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई | - | सदस्य सचिव |

४. सदर समितीचे सदस्य सचिव हे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या घटक सदस्यांकडून (उदा.मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र इत्यादी) या पुरस्कारासाठी शिफारशी मागवतील. सदर पुरस्कारासाठी प्राप्त झालेल्या शिफारशी तसेच अन्य संस्था व व्यक्ती यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारशी समितीपुढे विचारार्थ ठेवतील व सदर समिती पात्र साहित्यिकाची त्यामधून निवड करील.

५. कै.विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यासाठी साहित्य / वाड्.मय क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या नामवंत साहित्यिकांची निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे निकष निश्चित करण्यात येत आहेत :-

(१) प्रदीर्घकालीन साहित्यसेवा किती झालेली आहे ते पहावे.
(२) साहित्याच्या विविध प्रकारातील लेखन विशेषत: सृजनात्मक लेखन केले आहे किंवा कसे ते तपासावे.
(३) वयाची ज्येष्ठता लक्षात घ्यावी.
(४) मिळालेले वाड्.मयीन साहित्यविषयक सन्मानाची दखल घ्यावी.
(५) जनमानसातील उज्वल प्रतिमा याबाबत विचार व्हावा.
(६) महाराष्ट्रातील साहित्य आणि संस्कृतीसाठी संस्थांत्मक भरीव योगदान लक्षात घ्यावे.
(७) वाड्.मयीन क्षेत्रात नवीन विचारसरणीचा अवलंब केला आहे किंवा कसे याची दखल घेण्यात यावी.
(८) अन्य भारतीय भाषांमध्ये साहित्य अनुवादीत झाले असल्यास त्याचा विचार, परदेशी भाषांमध्ये अनुवाद झाला असल्यास त्याचा विचार व्हावा.
(९) प्राथमिक स्तरापासून विदयापीठीय स्तरापर्यंत अभ्यासासाठी साहित्याची निवड झाली असल्यास किंवा पुरस्कारार्थ विचाराधीन साहित्यिकाच्या साहित्यावर पीएचडी, एम.फिल सारख्या पदव्या मिळवल्या असल्यास त्याचा विचार व्हावा.
(१०) एकूण प्रकाशित ग्रंथांची संख्या विचारात घ्यावी.
(११) निवड समितीला निर्णय घेणे सुलभ व्हावे याकरिता निकषातील दहा गुण वैशिष्टयांना प्रत्येकी दहा गुण देण्यात येऊन प्रत्येक मुद्याला मिळालेल्या गुणांची प्रतिशत बेरीज सर्वाधिक ज्या साहित्यिकाची होईल त्याचा पुरस्कारासाठी विचार व्हावा.
(१२) महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळालेल्या सहित्यिकाचा पुरस्काराकरिता विचार करु नये.

६. या प्रित्यर्थ होणारा खर्च मागणी क्रमांक.झेडएफ-०२, २२०५, कला व संस्कृती (०१) योजनेतर योजना (०१) (०३) - उत्तम पुस्तकांना उत्तेजन - ५० इतर खर्च (२२०५ ३१९९) या लेखाशीर्षाखाली त्या त्या वर्षी मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. प्रस्तूत प्रकरणी होणाऱ्या खर्चासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास या संबंधीत देयकावर स्वाक्षरी करण्यासही या आदेशाव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संगणक संकेतांक क्र.२०१२१२१०१६५१२०८४६३३)

**( ललिता शि. देठे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
६) प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्‌य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
९) अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, मुंबई,
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
११) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१४) महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
१५) वित्त विभाग (व्यय-४ / अर्थसंकल्प-३ / अर्थसंकल्प-१४), मंत्रालय, मुंबई,
१६) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई
१८) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई,
१९) सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
२०) अवर सचिव, (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१) **भाषा - ३ (संग्रहार्थ).**